महाराष्ट्र शासन
रा.आ.पोदार वैद्यक महाविद्यालय (आयु),
अधिष्ठाता यांचे कार्यालय, डॉ. ॲनीबेझंट रोड,वरळी, मुंबई ४०० ०१८.
०२२ - २४९३४२१४ फॅक्स . . ०२२ - २४९३६८८१
(website :- www.ayurvedinstitute.com, email :- deanrapmc@gmail.com)

---

जा.क्र. राआपोम/भांडार/भोजनालय ठेका/२०२४/5870 दिनांक :- 06 AUG 2024

**भोजनालय चालविण्याकीरता जाहीरात**

प्रति,

---------------------

---------------------

---------------------

---------------------

विषय :- रा.आ.पोदार वैद्यक महाविद्यालय (आयु.), वरळी, मुंबई महाविद्यालयाचे आवारात नव्याने बांधण्यात आलेल्या उपहारगृहातील भोजनालय चालविणेसाठी वार्षिक ठेका देणेबाबत दोन लिफाफा पध्दतीने दरपत्रक मागविणेबाबत.

महाविद्यालय अधिनस्त संस्थेतील अध्यापक व कर्मचारी मिळून सुमारे २०० ते ३०० व्यक्तिंचा चहा, नास्ता व शाकाहारी भोजनाची व्यवस्था या महाविद्यालयाच्या आवारात उपलब्ध असलेल्या जुनी रसशाळा इमारत येथील मागील बाजूस नव्याने बांधण्यात आलेले भोजनालय चालू करण्यासाठी ठेकेदाराकडून दोन लिफाफा पध्दतीने दरपत्रके मागविण्यात येत आहेत. त्यासाठी खालील अटी व शर्ती यांच्या अधिन राहून दरपत्रक सादर करावे.

१. दरपत्रके दोन लिफाफा पध्दतीची राहतील. लिफाफा क्रं.०१ हा तांत्रिक पडताळणी करीता असेल. लिफाफा क्रं. ०१ मध्ये खालील कागदपत्रे सादर करावी.

१) ठेकेदाराचा पुर्ण पत्ता, दुरध्वनी क्रमांक, जीएसटी क्रमांक

२) अन्न व औषध प्रशासन विभागाअंतर्गत नोंदणीकृत परवानाधारक असल्याची कागदपत्रे

३) जीएसटी प्रमाणपत्र

४) संस्था कंपनी असेल तर कंपनी कायदया अंतर्गत रजिस्ट्रेशन प्रमाणपत्र सादर करावे, संस्था पाटर्नर शिप मध्ये असेल तर नोंदणीकृत Partnership Deed सादर करावे.

५) मागील तीन आर्थीक वर्षाचे सनदी लेखापाल यांनी प्रमाणित केलेले लेख्यांची प्रत सादर करावी ( Profit & Loss Statement , Balance Sheet )

६) शासकीय/निमशासकीय/खाजगी संस्थेमध्ये भोजनालय चालविण्याचा अनुभव प्रमाणपत्र ज्या ठिकाणी काम केलेले आहे त्या ठिकाणाचा पुर्ण पत्ता, संस्थेचे नाव व दुरध्वनीक्रमांक नमूद करावा.

७) भोजनालय चालविणेसाठी अटी व शर्ती मान्य असल्याबाबतचे रुपये १००/- च्या स्टॅप पेपरवर देणे बंधनपत्र राहील

८) हमीपत्र -१ व हमीपत्र -२ विहीत नमुन्यात भरुन देण्यात यावे.

लिफाफा क्रं.०२ हा वित्तीय पडताळणी करीता असेल. लिफाफा क्रं.०२ मध्ये भोजनालय चालविण्यासाठी विहीत नमुन्यात पदार्थाचे दर सादर करावेत.

सदरचे दोन्ही लिफाफे वर लिफाफा क्रमांक नमूद करुन ते स्वतंत्र सिलबंद करुन एका मोठया लिफाफयात एकत्र सिलबंद करुन पाठविण्यात यावेत. लिफाफा क्रं.०१ मध्ये पात्र ठरल्यानंतरच लिफाफा क्रं.०२ उघडण्यात येईल.

२. रा.आ.पोदार वैद्यक महाविद्यालय ( आयु.), वरळी, मुंबई अधिनस्त नवीन उपहारगृह येथील भोजनालय चालविण्याचा करार प्रथमत: ११ महिने कालावधीचा असेल. कराराच्या दिनांकापासून पहिल्या अकरा महिन्यांच्या कालावधीत सेवा, खाद्यपदार्थाचा दर्जा, चव, करारात स्विकारलेली किंमत व त्यानुसार प्रत्यक्षात पुरवठा केलेल्या खाद्यपदार्थांचा परिणाम ( वजन, संख्या, प्रमाण इ. ) आणि स्वच्छता तसेच कर्मचा-यांच्या सेवा व वर्तवणूक यांचे मुल्यामापन करुन पुढील ११ महिन्यांच्या कालावधीकरिता करार वाढविण्यात येईल.

३. दरपत्रक सादर करणारा ठेकेदार हा अन्न व औषध प्रशासन विभागाअंतर्गत नोंदणीकृत परवानाधारक असणे बंधनकारक आहे.

४. पात्र ठेकेदारास रुपये ५०,०००/- अनामत रक्कम भरणे बंधनकारक आहे. ठेकेदाराचा करार संपुष्टात आल्यानंतर ठेकेदाराकडून कोणतेही शासकीय येणे, थकबाकी, पाणी-वीज बील, नुकसान भरपाई यासारखी वसूली वजा करुन अनामत रक्कम ठेकेदारास परत करण्यात येईल. करार कालावधीत ठेकेदाराचा अनामत रक्कमवर कोणताही अधिकार असणार नाही.

५. भोजनालय ( मेस ) चालविणेसाठी उपलब्ध करुन दिलेली जागा शासन नियमानुसार विनामुल्य वापरता येईल.

६. पात्र ठेकेदारास विजेच्या मासीक देयकाचा भरणा वेळोवेळी विहीत वेळेत करुन त्याची प्रत कार्यालयास जमा करावी लागेल. या अटीचा भंग झाल्यास कोणतीही पुर्वसुचना न देता भोजनालयाचा ठेका रदद करण्यात येईल.

७. पाणी बीला करीता सार्वजनिक बांधकाम विभागाने ठरवून दिलेले रुपये १,०००/- दर महिन्याच्या ७ तारखेपर्यंत कार्यालयातील रोखपाल यांचेकडे भरणा करावेत. पाणी शुध्दीकरणाकरीता आर.ओ व्यवस्था स्वत:ठेकेदारास करावी लागेल.

८. स्वयंपाकाची भांडी, ताटे, वाटया, शेगडया, गॅस इत्यादी सामानाची व्यवस्था ठेकेदारास करावी लागेल. अग्निसंरक्षक यंत्रणा व्यवस्था ठेकेदारास करावी लागेल.

९. भोजनालय ( मेस ) सकाळी ७.०० ते रात्री ९.०० वाजेपर्यंत सुरु राहील.

१०. भोजलनालय चालविणेसाठी विहीत करण्यात आलेल्या अटी व शर्ती मान्य असल्याबाबत रुपये १००/- च्या स्टॅम्प पेपरवर लिखित स्वरुपात देणे बंधनकारक राहील.

११. भोजनालयाच्या ताबा स्विकारतेवेळी भोजनालयामध्ये आवश्यक असणारी किरकोळ दुरुस्ती ठेकेदारास करावी लागेल. भोजनालयात बसण्याकरिता आवश्यक त्या खुर्चा, टेबलाची व्यवस्था ठेकेदारास करावी लागेल.

१२. सुटीच्या दिवशी व अन्य प्रसंगी महाविद्यालयाच्या सहमतीशिवाय भोजनालय बंद ठेवता येणार नाही.

१३. ज्या ठिकाणी अध्यापक/कर्मचा-याची बसण्याची व्यवस्था असेल तेथे खाद्य पदार्थांची